केंद्र शासन पुरस्कृत प्रि-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणा-या प्रशासकीय खर्चासाठी पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत......

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः- निधीवि-२०१९/प्र.क्र.९/एसडी-५

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२

दिनांक :- ३० मार्च, २०१९

वाचा :-

१) संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण ,महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र./अप्रौशि/ प्रि-मॅ/२०१८-१९/का-४/७,दि. ५ जानेवारी, २०१९.

२) केंद्र शासनाचे पत्र क्र.११/७/२०१४-एसएस, दि.११/०९/२०१८

३) वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थस-२०१९/प्र.क्र.-४२/अर्थ-३, दिनांक ८ मार्च, २०१९.

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. निधीवि-२०१९ /प्र.क्र.९/ एसडी-५, दिनांक १४ मार्च, २०१९

५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. पुनर्वि-२८१९/(३/१९)अर्थसंकल्प(१), दिनांक- ३० मार्च, २०१९

प्रस्तावनाः-

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ही १०० टक्के केंद्र सहाय्यित आहे. सदर योजनेकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने दि. ११ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या आदेशान्वये रु.१, ४७,७५,००६/- (अक्षरी रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार सहा फक्त) इतका निधी राज्यास उपलब्ध केला असून सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा असल्याचे अभिप्राय वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने दिले आहेत. या योजनेच्या लेखाशीर्षामध्ये (२२०२ जी ९२१) सन २०१८-१९ करीता रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) इतकी तरतूद मंजूर असून सदर तरतूद शासन निर्णय दि. १४ मार्च, २०१९ अन्वये आयुक्त (शिक्षण), पुणे यांना वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित तरतूद रु. ९७,७५,००६/- (अक्षरी रुपये सत्याण्णव लाख पंच्याहत्तर हजार सहा फक्त) इतका निधी पुनर्विनियोजनाने लेखाशीर्ष (२२०२ जी ९२१) मध्ये शासन निर्णय दि. ३० मार्च, २०१९ अन्वये उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

शासन निर्णय :-

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या केंद्र पुरस्कृत मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेसाठी रु. ९७,७५,००६/- (अक्षरी रुपये सत्याण्णव लाख पंच्याहत्तर हजार सहा फक्त)

एवढी तरतूद शिक्षण संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण,महाराष्ट्र राज्य पुणे हे या निधीसाठी आहरण व संवितरण अधिकारी राहतील. सदर निधी खर्च करताना केंद्र शासनाचे पत्र दि. ११ सप्टेंबर, २०१८ नुसार दिलेल्या अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर खर्च " मागणी क्र. ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) संकीर्ण (०२)(४७) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रीक-पूर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत योजना) (केंद्र हिस्सा) (२२०२ जी ९२१), ३१ ,सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) " या लेखाशिर्षाखाली सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून खर्च करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८६/१४७१, दि. १६ मार्च, २०१९ , वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २५४/१९/व्यय-५ दि. २७ मार्च, २०१९ व अर्थसंकल्प कार्यासनाच्या क्र. पुनर्वि-२८१९/(३/१९)अर्थसंकल्प(१), दि. ३० मार्च, २०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३३०१७३९०४९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Umeshrao Gaikwad

Digitally signed by Santosh Umeshrao Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Santosh Umeshrao Gaikwad
Date: 2019.03.30 17:45:02 +05'30'

(संतोष गायकवाड)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक,
२. मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र राज्य.
३. मा.प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे
६. संचालक , माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
८. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.

९. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), बृहन्मुंबई.

१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१२. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१५. वित्त विभाग (व्यय ५/अर्थोपाय/अर्थसंकल्प ६), मंत्रालय, मुंबई

१६.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

१७. निवड धारिका एसडी.-५